# मिरा भाईंदर महानगरपालिका

## // प्रेस नोट //

दि. 19/03/2025

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील इमारती/ सोसायटीमधील मैलामिश्रीत सांडपाणी सक्शन पंप कम जेटींग मशिन उपसा करून मौजे उत्तन येथील प्रकल्प ठिकाणी टाकल्याची बातमी दि. 19/03/2025 रोजीच्या दै. महाराष्ट्र टाईम्स, दै. सकाळ या वृत्तपत्रात प्रसिध्द झाली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील इमारती टॉवर्स, चाळी, घरे इत्यादी गृहसंकुले यांचेमार्फत महानगरपालिकेस सेप्टीक टँक सफाईबाबत शुल्क भरणा करण्यात येत आहे. शहरातील काही भागात गाव परिसर तसेच इमारती/ गृहसंकले/ व्यवसायीक आस्थापना ज्या ठिकाणी मलप्रवाह वाहिनी (Sewer Network) कार्यान्वीत नाहीत अशा ठिकाणी सेप्टीक टँक सफाई करीता महानगरपालिकेद्वारे सांडपाणी वाहुन नेणेकरीता घनकचरा व्यवस्थापन विभागात शुल्क भरणा करून महानगरपालिका मालकीच्या 02 व शासनाच्या 02 मैलावाहु यांत्रिक वाहनामार्फत सांडपाणी पाण्याचा उपसा करण्यात येत आहे.

दि.18/03/2025 रोजी महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडून प्राप्त सक्शन पंप कम जेटींग मशिन वाहन क्र. MH42 BF 6947 या वाहनाद्वारे सकाळी 11.30 वाजता राई राम मंदिर येथील मैला संकलीत करुन तदनंतर सदर वाहन वाहनचालक श्री. भावेश दाभोळकर हे उत्तन डंपिंग ग्राऊंड येथे घेऊन गेले. सदर वाहन उत्तन डंपिंग येथे साधारणत: दुपारी 1.00 वाजता पोहचले तदनंतर तेथे साधारणत: 20 ते 25 जणांच्या जमावाने सदर वाहन अडवून वाहनचालकासह उत्तन पोलीस स्टेशन येथे घेऊन गेले.

तद्नंतर श्री. ऑस्कर चान्स मेंडोन्सा व डोंगरी उत्तन येथील ग्रामस्थ यांनी मा. आयुक्त यांची सदर प्रकरणाबाबत भेट घेतली असता, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे सहा. आयुक्त, श्री. योगेश गुणिजन यांना या प्रकरणाबाबत चौकशी करून वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करणेबाबत निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी दि. 18/03/2025 मा. आयुक्त यांना वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर केलेला आहे.

सहा. आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन यांचे वस्तुस्थितीदर्शक अहवालाच्या अनुषंगाने सदर वाहनचालक यांना कामावर कमी करणेबाबत संबंधित एजन्सी यांना कळविण्यात आले आहे. तसेच सदर मैलामिश्रीत सांडपाणी एस.टी.पी. मध्ये सोडण्यास नकार दिल्याने श्री. के.डी. देशमुख, कंत्राटी अभियंता व एस.टी.पी. प्लांट कर्मचारी श्री. विरेंद्र सिंग यांचेवर उचित कार्यवाही करणेबाबत संबंधित विभागास कळविण्यात आले आहे. तसेच मैलामिश्रीत पाण्याची शास्त्रीय पध्दतीने प्रक्रिया करणेकामी Desludging vehicle STP Plant येथे खाली करणेबाबत पाणीपुरवठा व मलनिस:रण विभाग यांना कळविले आहे.

(डॉ. सचिन बांगर)
उपायुक्त (घ.व्य.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner